क्रमांक : मग्रारो २०१३/प्रक्र.१४२/रोहयो-१०-अ,

महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग,
राजगुरु हुतात्मा चौक, मादाम कामा रोड
नवीन प्रशासकीय इमारत, १६ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १८ मार्च, २०१३.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी ( मुंबई व उपनगर शहर वगळून),
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी ( मुंबई व उपनगर शहर वगळून).

विषय :- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने (नरेगा) अंतर्गत जॉब कार्ड चे नुतनीकरणाबाबत.
संदर्भ :- मग्रारो २०११/प्रक्र.४/रोहयो-१०-अ,
दिनांक : २५ जुलै,२०१२.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने (नरेगा) अंतर्गत जॉब कार्ड चे नुतनीकरण करण्यासाठी दिनांक २५ जुलै, २०१२ च्या शासन निर्णय अन्वये विशेष मोहिम घेण्याच्या संदर्भात सूचना निर्गमित करण्यात आली होती. त्याच बरोबर सदर नुतनीकरणाची मोहिम विहित कालमर्यादेत पूर्ण करावयाची असल्यामुळे कामांचे वेळापत्रक देण्यात आले होते.

२. शासन निर्णयामध्ये जॉब कार्ड नुतनीकरणाची सविस्तर सूचना तसेच मोहिम राबविण्यासाठी स्तरनिहाय प्राथमिक जबाबदारी, पर्यवेक्षकीय जबाबदारी व संपूर्ण मोहिम यशस्वीरित्या राबविण्याची जबाबदारी तक्त्यामध्ये देण्यात आली होती. सदर मोहिम सुरु होऊन जवळ जवळ आठ महिने पूर्ण झालेले आहेत. परंतु अद्यापही जॉब कार्ड नुतनीकरणाचे काम पूर्ण झालेले नाही. यासाठी मोहिमेला दोन वेळा मुदतवाढही देण्यात आलेली आहे. दिनांक १३.१२.२०१२ अन्वये देण्यात आलेल्या मुदतवाढीमध्ये ३१ जानेवारी, २०१३ पर्यंत मोहिम पूर्ण करुन दिनांक १.२.२०१३ पासून जुने जॉब कार्ड अवैध करावयाचे होते.

३. जॉब कार्ड अवैध करण्यापूर्वी प्रत्येक जिल्हाधिका-यांनी स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात देऊन त्यानंतरच जॉब कार्ड अवैध करणे अपेक्षित आहे. काही लोक प्रतिनिधींकडून अशा तक्रारी प्राप्त होत आहेत की, जॉब कार्ड नुतनीकरण न झाल्यामुळे लोकांना कामे मिळण्यास अडचण होत आहे.

४. तेव्हा याबाबत स्पष्ट करण्यात येते की, शासनाची अशी अपेक्षा होती की, दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे नियोजित वेळेत आपल्याकडे जॉब कार्ड नुतनीकरणाची मोहिम पूर्ण झाल्यानंतर स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात दिल्यानंतरच जुने जॉब कार्ड अवैध ठरतील. तसेच ज्या मजूरांकडे जॉब कार्ड नाही किंवा नवीन मजूर आहेत त्यांनी नवीन जॉब कार्ड साठी अर्ज करुन त्यांना नवीन जॉब कार्ड देणे अपेक्षित होते. तथापि अशाप्रकारे कार्यवाही न करता काही जिल्हयांमध्ये विनाकारण संभ्रम निर्माण झालेले आहेत. तसेच काही जिल्हाधिका-यांनी तांत्रिक अडचणींमुळे जॉब कार्ड नुतनीकरणाचे काम पूर्ण झाले नसल्यामुळे जुने जॉब कार्ड चालू ठेवावे व नवीन जॉब कार्ड वितरित केल्यानंतर जुने जॉब कार्ड रद्द करावे अशी विनंती केलेली आहे.तसेच मोहिमेला मुदतवाढ मागितली आहे.

५. आपल्याला विदीत आहे की, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (नरेगा) सन २००८ पासून संपूर्ण राज्यामध्ये राबविण्यात आलेली आहे आणि योजनेची पाच वर्षे पूर्ण झालेली आहेत. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण योजना कायदा २००५ अंतर्गत अनूसूची (२) मधील भाग (३) नुसार दर पाच वर्षांनी मजूरांना वाटप केलेले जॉबकार्डचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. सदर बाब ही कायद्यानुसार बंधनकारक असल्यामुळे जॉबकार्ड नुतनीकरण नोंदणी करणे सक्तीचे आहे.

६. जॉब कार्ड नुतनीकरण करुन घेण्याची प्राथमिक जबाबदारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( ग्रामपंचायत ) जिल्हा परिषद व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांची आहे. **जिल्हयांना आवश्यक वाटल्यास ते टप्प्या टप्प्याने एकेका पंचायत समितीत मोहिम राबवून कार्यवाही पूर्ण करु शकतील. जॉबकार्ड नुतनीकरणाची कार्यवाही करताना, अवैध जॉबकार्ड ऐवजी नवीन जॉबकार्ड देण्याकरिता ग्रामपंचायत व पंचायत समिती स्तरावर पुरेशा प्रमाणात कोरे नवीन जॉबकार्ड उपलब्ध रहातील याची संबंधीतांनी दक्षता घ्यावी.**

७. **जोपर्यंत जुने जॉब कार्डचे पूर्णपणे MIS नोंदणीसह नुतनीकरण होऊन ते वैध असल्याची खात्री केली जात नाही तोपर्यंत जुने जॉब कार्ड अवैध ठरणार नाही. नुतनीकरणाबाबत MIS वर नोंदणी करतांना ज्या जॉब कार्डचे नुतनीकरण होणार नाही अशा जॉब कार्डची MIS वरील नोंद रद्द करणे आवश्यक आहे. त्याकरिता केंद्र शासनाच्या वेबसाईट मधील नोंदणी (Registration) या पेजवर जाऊन संबंधीत जॉब कार्ड का रद्द करण्यात येत आहेत याची तारखेसह नोंद घेऊन जॉब कार्डची MIS वरील नोंद रद्द करावी. जर पुढील सहा महिन्यामध्ये सदर जॉबकार्डच्या नुतनीकरणासाठी संबंधीत जॉबकार्ड धारकाचा अर्ज आला नाहीतर जॉब कार्ड कायम स्वरुपी रद्द करण्यात यावे.**

८. **जॉब कार्डचे नुतनीकरण होऊन त्याची वैधता दर्शविल्यानंतर व जाहीरात दिल्यानंतरच जुने जॉब कार्ड अवैध ठरविण्यात यावे.** दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१३ रोजी घेण्यात आलेल्या व्हिडीओ कॉन्फरन्सींग मध्ये सुध्दा याबाबत विस्तृत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

९. **सदर मोहिम पूर्ण करण्यासाठी दिनांक ३१ मे, २०१३ ही अंतिम मुदत देण्यात येत आहे.** यापुढे मुदतवाढ दिली जाणार नाही. तसेच ज्या जिल्हयांनी जॉब कार्ड नुतनीकरण करुन घेतले नाही, त्या जिल्हयांना निधी वितरित केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. तरी आता सर्व जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सूचना देण्यात येते की, त्यांनी विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन जॉब कार्ड नुतनीकरणाची मोहिम पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करावी.

१०. सोबत वृत्तपत्रामध्ये द्यावयाच्या जाहिर सूचनेचा नमुनादाखल मजकूर देण्यात येत आहे. जिल्हयांनी यावर आवश्यक ती सुधारणा करुन जाहीर सूचना आवश्यकतेनुसार निर्गमित करावी.

(आर.विमला)
उप सचिव (रोहयो)
18/3/2013

सोबत : जाहीर सूचनेचा नमुना.

०६.०३.२०१३ JOBCARD.DOC

## जाहीर सूचनेचा नमुना

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (नरेगा) अंतर्गत वापरण्यात येणारे जॉबकार्ड**

**जिल्हा** ------------------------ **पंचायत समिती**--------------------------

------------------ पंचायत समितीस मजूरांना आतापर्यंत ----------------- नवीन जॉब कार्ड वितरित केले आहे. ----------------------- दिनांकापासून ----------------------पंचायत समितीकडील जुनी कार्ड अवैध (Invalid) ठरविण्यात येत आहे.

अवैध ठरविलेल्या जॉबकार्डधारकांना किंवा नवीन मजूरांना नवीन कार्ड पाहिजे असल्यास त्यांनी Form I चा अर्ज ग्राम पंचायत मध्ये भरुन पावती घ्यावी. त्यानंतर आवश्यक ती तपासणी करुन पात्र ठरणा-या मजुरांना १५ दिवसाच्या आत नवीन कार्ड देण्यात येईल.

गट विकास अधिकारी
पंचायत समिती -------------

मुख्य कार्यकारी अधिकारी

जिल्हाधिकारी